परिपत्रक क्र७८

**सेवा निवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती,**
**निधन व् सेवेतून कमी इत्यादि कारणाने**
**रिक्त झालेल्या जागा व सामान्य सुचना. . .**

# रयत शिक्षण संस्था,सातारा

**कर्मवीर समाधि परिसर, सातारा.**

**उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालये, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम व् तांत्रिक विभाग, आश्रम शाळा**

**परिपत्रक क्र ७८ दि.०२/०७/२०१९**

**सर्व शाखा प्रमुख,**
**उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालये,**
**उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम व् तांत्रिक विभाग, आश्रम शाळा**
**रयत्त शिक्षण संस्था**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये अनुदानित / विना अनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा,उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम व तांत्रिक विभागाकडील सेवा निवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, निधन व सेवेतून कमी इ. कारणाने रिक्त झालेल्या जागा तसेच सेवक संचनिश्चिती मधील उपलब्ध कार्यभारा नुसार तासिकातत्वावरील हंगामी स्वरूपातील रिक्त असणारी पदे भरण्याबाबतची कार्यवाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी वेळेत पूर्ण करावयाची आहे. तेंव्हा आपल्या शाखे मध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या संच निश्चिती मधील कार्यभारानुसार दि. ३०/०६/२०१९ अखेर रिक्त असणा-या पदांची माहिती सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये भरुन संस्थेच्या junior@rayatshikshan.edu या मेल वर दि. ०६/०७/२०१९ पर्यंत पाठवावी पदाची व हंगामी स्वरूपात कार्यरत असणा-या सेवकांची माहिती देताना पूर्णवेळ/ अर्धवेळ, तासिका तत्वावर व हंगामी स्वरूपातील पदे कार्यभारानुसार व विषय निहाय इ. तपशील नमूद केल्यास त्या नुसार सेवक पुर्तता अचूक व वेळेत करणे अधिक सोयीचे होइल.

तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागाकडे मराठी , इंग्रजी व जी.एफ.सी. इ विषयांसाठी तासिका तत्वावर प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये नियुक्त्य कराव्या लागतात. काही जिल्ह्यांमध्ये गतवर्षी नियुक्त केलेल्या हंगामी उमेदवारास, पुढील वर्षी पुन्हा नियुक्ती दिल्यास मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी कार्यालयाकडून मान्यता नाकारली जाते व आशा सेवकांचा पगार पर्यायाने शाखेतुन द्यावा लागतो. तेंव्हा गतवर्षी काम करणा-या सेवकांच्या पूर्ण नावांचा उल्लेख व जागा रिक्त होण्याचे कारण रकान्यात करावा.

तसेच गतवर्षी कार्यरत असणा-या सेवकाचे वर्तन, गुणवत्ता शैक्षणिक निकाल इत्यादी कारणास्तव बदल हवा असल्यास तसा स्पष्ट उल्लेख प्रपत्रातील शेरा रकान्यात करावा.

आपल्या शाखेच्या रिक्त जागांच्या माहितीच्या आधारे पुढील नियुक्तिची कार्यवाही होणार आहे. त्यासाठी प्रत्येक शाखेने रिक्त पदावर लमसम नियुक्त्यांसाठी मागणी करणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

**विभागाचे नाव : अनुदानित / विना अनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये/ आश्रमशाळा / उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम व तांत्रिक अभ्यासक्रम**

| अ.क्र | विषय | सेवक संच निश्चिती नुसार मंजूर कार्यभार | गतवर्षी कार्यरत असलेल्या सेवकाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

कळावे.

सहसचिव (उच्च शिक्षण),
रयत शिक्षण संस्था,सातारा.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
सर्व विभागीय कार्यालये, रयत शिक्षण संस्था यांना